**Dr. Kirit Somaiya**
**B.Com, FCA, Ph.D.**
*Ex-Member of Parliament*
*Convenor, BJP Investors' Cell*
*Member, National Executive*

**Bharatiya Janata Party**
**भारतीय जनता पार्टी**

जुलै ०५, २००७

# मिठी नदीचा घोटाळा आणखी बळी घेणार - डॉ. किरीट सोमैया

मिठी नदीने या वर्षी आतापर्यंत ५ बळी घेतले आहेत. याचे कारण मिठी नदीतून गाळ काढण्याच्या कामात झालेला घोटाळा आहे, असा आरोप भाजप नेते आणि माजी खासदार डॉ. किरीट सोमैय्या यांनी केला आहे.

मिठी नदीमध्ये तुळशी, विहार, पवई या तीन तलावांतून पाणी येते. हे तिन्ही तलाव अद्याप भरून वाहायचे आहेत. येत्या दोन आठवड्यांत ते भरून वाहू लागतील. या पार्श्वभूमीवर आणखी एखादा जोरदार पाऊस झाला तर साकीनाका ते विमानतळ या भागातील मिठी नदीचा परिसर पुन्हा एकदा पुराखाली बुडण्याची शक्यता आहे. या भागातील क्रांतीनगर संहिता इंडस्ट्रीयल इस्टेट, एअर लाईन कॉलनी, जरीमरी, सफेद पूल, कल्पना टॉकिज जंक्शन आदी भागात पाणी साठण्याची शक्यता लक्षात घेऊन सावधगिरीचे उपाय योजावेत, असा इशारा खासदार डॉ. किरीट सोमैया यांनी मिठी नदी प्राधिकरण तसेच राज्य सरकारला दिला होता. त्यामुळे यापुढेही परिस्थिती तशीच राहिल्यास मिठी नदी आणखी बळी घेण्याची शक्यता असल्याचा आरोपही डॉ. सोमैया यांनी केला.

सावधगिरीचा इशारा देऊनसुद्धा प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात हलगर्जीपणा करणाऱ्या सर्व अधिकाऱ्यांविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करावेत अशी मागणी भाजपने केली आहे. मिठी नदीतील गाळ काढण्याचे नेहमीचे कामसुद्धा करण्यात आलेले नाही. आता एमएमआरडीएने सारवासारवीचा प्रयत्न सुरू केला आहे. एमएमआरडीएने दावा केला आहे की, मिठी नदीतून २.६० लाख क्युबिक मीटर गाळ काढण्यात आला आहे. मात्र हा दावा दिशाभूल करणारा आहे. यामध्ये नाईक तलाव, वाकोला नाला आणि अन्य नाल्यांमधील गाळाचाही समावेश आहे. वास्तविक मिठी नदीतील गाळ २३ लाख घनमीटर असून त्यातील ५ टक्केसुद्धा गाळ काढण्यात आलेला नाही. एमएमआरडीएनेच पावसाळ्यापूर्वी मिठी नदीतील ७.५लाख घनमीटर गाळ काढण्याची वर्क ऑर्डर जारी केली होती.

हा एवढा गाळ गेला कुठे, असा प्रश्न डॉ. किरीट सोमैया यांनी एमएमआरडीएला केला आहे. मुंबई महापालिकेने डॉ. सोमैया यांना दिलेल्या माहितीनुसार महापालिकेकडे २० हजार घनमीटरहून कमी गाळ जमा झाला आहे. नवी मुंबई तसेच ठाणे महापालिकांनी आपापल्या हद्दीत हा गाळ अनधिकृतपणे टाकण्यात येऊ नये असा इशारा मिठी नदीच्या कंत्राटदारांना दिला आहे. कोपरखैराणे येथे १५०० घनमीटर व ठाणे बाळकुम येथे १०००घनमीटर गाळ टाकण्यात आला आहे.

या संदर्भात एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, ती म्हणजे, मागील वर्षी भारताच्या महालेखापरीक्षकांनी (कॅग) मिठी नदीतील गाळ काढण्याच्या कामातील घोटाळ्याची चौकशी करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले होते.

मुंबई महापालिकेने आतापर्यंत १,६८,२०० घनमीटर गाळ काढला असून १,३३,८०० घनमीटर गाळ वाहून नेला आहे.

**प्रसिद्धी सचिव**

**BJP Office :** ● 11, Ashoka Road, New Delhi 110 001

➔**Please Reply :** 9C, Neelam Nagar, Mulund (E), Mumbai 400 081- Tel21639649/21634152/
(M)9869220027 ● Email: kirit@vsnl.in, kiritsomaiya@gmail.com Website : www.kiritsomaiya.com